म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३६०

# केसर

## सुशील

REFBK-0022388
REFBK-0022388

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना :—** खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 JAN 1979

(क्र.मा.प.)

१५१०७८
काव्य संदर्भ

# केसर

सुशील

REFBK-0022388
REFBK-0022388

क्रांती प्रकाशन

क्रांती प्रकाशन : २

प्रथमावृत्ती : १९७७

© १९७७, सुशीला पगारिया

किंमत : नऊ रुपये

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४०० ००४

प्रकाशिका :
कु० क्रांती पगारिया
क्रांती प्रकाशन
स्टेट बँकेमागे
जिल्हा पेठ, जळगाव

वितरक :
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी
गिरगाव
मुंबई ४०० ००४

पू० सौ० बाई, काकाजी आणि मामाजी
यांना सविनय

—सुशील

२ घाट
३ पारा
४ मी असेन
५ क्षण बावरे
६ तुला सारेंच आठवेल काय ?
७ सूर्यासाठी
८ पाखरांनो
९ फुंकर
१० व्यसन
११ क्षणांची वाटणी
१२ इतकेंच कसें
१३ अस्तित्व
१४ संपून जाय
१५ प्रियकरा
१६ भरल्या जंगलांत
१७ हेंच झाड
१८ शब्दांनो
१९ अधिक-उणे
२० हरवून जाल
२१ जाणीव
२२ देहापुरती
२३ कोणी तरी या रे
२४ भाऊसाहेब खांडेकर
२५ माझी चोच
२६ निळाई
२७ गाणं आहे
२८ शिंपलं
२९ अभंग
३० पुन्हा
३१ धागे
३२ उजळूं दे
३३ वाया
३४ देहाकृती चंद्रसूर्यांच्या
३५ प्रश्नांचा पूर
३६ सरेल ग
३७ होडी
३८ आठी गाठी
३९ भर दिवसा
४० शब्द

४१ तू
४२ उल्कापात
४३ अपुरी आहे
४४ तळ
४५ कदाचित्
४६ भैरवी
४७ त्याचं काय
४८ साक्ष
४९ सावलीच
५० ऊन
५१ अदेखणा
५२ छायावन
५३ भोवरे
५४ दुसरा राजपुत्र
५५ फिके ऋतू
५६ महिरपींत
५७ काजळरेखा
५८ गंधभार
५९ लेणं
६० धुकं
६१ काळेभोर
६२ आधार
६३ सरी
६४ बंजररान
६५ क्रमप्राप्त
६६ सावकार
६७ पुष्करिणी
६८ शिल्प
६९ दिवस मावळतांना
७० पदर
७१ तसें
७२ पाऊस
७३ चौकट
७४ कुंदा
७५ ठेव
७६ घरटं माझं
७७ चाळ
७८ प्रवास
७९ निरोप देतांना
८० तुझे डोळे

२२३८८
का ०५
२३६०

# ‘सुशील’ची कविता

ह्या कवितांना प्रस्तावना, परिचय असं काही प्रारंभिक असण्याचं काही कारण आहे काय ? ‘सुशील’चं कवितेच्या अंगणात काही हे पहिलं पाऊल नाही. तिथं तिनं आधीच आपलं ‘मनवृंदावन’ उभारलं आहे आणि त्यात आपल्या भावनांची तुळस लावली आहे. तिला मंजिऱ्या आल्या. त्याचा एक बहर तिनं गोळा केला. आता हा दुसरा.

‘सुशील’च्या ‘मनवृंदावन’चं रसिकांनी कौतुक केलं. विष्णू सखाराम खांडेकरांनी समर्पक शब्दांत ‘सुशील’च्या कवितांना आशीर्वाद दिले. त्यांना जाणवलं की ह्या कवितांतून “अगदी आगळं जग डोकावून पाहत होतं—मनाला चटका लावणारं, नाजुकपणानं नटलेलं पण अस्वस्थ करणारं, नकळत शब्दाबरोबर भावनेची भुरळ घालणारं.”

हे ‘मनवृंदावन’ जेव्हा मी पाहिलं तेव्हा तिथं मी विसावलो. त्या कविता अशा वाटल्या की त्या नुसत्या चाळण्यासारख्या नाहीत, भरभर वाचण्यासारख्या नाहीत, तर हळूहळू, शांतपणं, संथपणं, एकेका शब्दावर थांबत थांबत, त्यातला सूक्ष्म ध्वन्यर्थ जाणवून घेत मनन करावयास लावणाऱ्या आहेत. हे ‘सुशील’च्या कवितेचं वेगळेपण मला ‘मनवृंदावना’तच जाणवलं.

काव्यात जे ‘गुण’ असतात त्यांत ‘सौकुमार्य’ हाही एक गुण मानलेला आहे. प्रत्येक कवीचा एक स्थायी भाव असतो आणि तोच त्याच्या

कवितेचा विशेष असतो. तो विशेषच सहृदय रसिकाला आकृष्ट करून घेत असतो. कवितेत सारेच गुण सारख्या प्रकर्षानं असावेत ही अपेक्षाच मुळात चुकीची आहे. काही समीक्षक केव्हा केव्हा "अमुक कवीच्या काव्यात ओज आहे पण सौकुमार्य नाही", "अमुक आहे पण तमुक नाही", "वैयक्तिक भावना आहेत पण सामाजिक जाणिवा नाहीत" अशी विधानं आलटून पालटून करीत असतात. त्यांना समतोल समीक्षा समजलं जातं! वास्तविक त्या कवितेत जे काय आहे त्याचं आकलन आणि मूल्यांकन सहृदयतेनं करून ते विशद करण्याचा प्रयत्न समीक्षकांनी करावयास पाहिजे.

'मनवृंदावन'मधल्या कविता वाचल्या त्या वेळी त्या कवितांतल्या आशयाचा, आविष्काराचा आणि अभिव्यक्तीचा वेगळेपणा माझ्या मनाला हलवून गेला. आजकाल कवितेच्या प्रदेशात बराच कडक उन्हाळा आहे. फार गरम वारे वाहताहेत. चटके बसतील अशा गरम झळा. दूर मृगजळ दिसावं; त्यानं तरी जरा सुखवावं तर तेही नाही. दिवसा धूळवादळं, 'आंधी', आणि रात्री 'लू'. अशा अवस्थेत सकाळी एखादी शीतल वाऱ्याची झुळूक आपली सुखदुःखं सांगत हळुवारपणं थरथरत यावी तशा 'सुशील'च्या कविता मनाला खऱ्या काव्याचा आनंद देऊन गेल्या.

पण मग वाटलं, हे वेगळं कविव्यक्तित्व 'सुशील'च्या कवितेत टिकून राहील का? की भोवतालच्या चक्रीवादळात भिरभिरून विरून जाईल? स्वतःच स्वतःला हरवून बसेल? पण आता ह्या 'मनवृंदावना'पुढच्या कवितांचे 'केसर' पाहिले म्हणजे विश्वास येतो की हा कविजीव आपली वाट शोधत राहणार. इतरांच्या वाटेकडे कधी झुकणार नाही.

कवी हाताच्या बोटांवर मोजता येत तो काळ गेला. आता तीन आकडे पुरणार नाहीत. ते ठीक आहे. कविता ऐकण्याची आवड आणि ऐकवण्याची हौस वाढत आहे. "असा कवी हजारांत नाही" असं एखाद्या कवीला यथार्थपणे म्हणणं शक्य झालं आहे. पण ज्यांच्या कवितांतला वेगळेपणा जाणवतो आणि ज्यांच्या व्यक्तित्वाचा ठसा त्यांच्या अभिव्यक्तीत ओळखू येईल असा उमटलेला असतो असे कवी थोडेच आहेत. त्या थोड्यांत 'सुशील' आहे.

ही माझी आवडनिवड. प्रत्येकाची ती वेगळी असू शकते. पण ती मनमोकळी असावी. दावी बांधलेली नसावी. मोकळी असली तर पुष्कळांची

आवड सारखीच असल्याचं दिसतं. त्या सारखेपणावरच तर काव्यमीमांसा होऊ शकते. एरव्ही "मला हे आवडतं—ते आवडत नाही" ह्यापुढं समीक्षेचं पाऊल सरकूच शकलं नसतं.

कविता पहिल्यानं दिसते, वाचकासमोर येते, पोहोचते ती तिच्या अभिव्यक्तीतून. म्हणजे ती शब्दांत अवतरल्यावर. कुणाकडून ऐकणं काय किंवा आपण स्वतः वाचणं काय—यात मूलतः भेद नाही. कारण आपण ती आपल्याशी वाचतानादेखील स्वतःला ऐकवतच असतो. ही क्रिया सूक्ष्मपणं होत असते, व्हायला पाहिजे. कविता वाचणं म्हणजे काही वर्तमानपत्र वाचणं नाही. ती जर समर्थपणं अभिव्यक्त झालेली असेल तर आरंभापासूनच तिच्यातले शब्द तिच्यातला ताल, आंदोलन, लय ह्यांची जाणीव करून देतात. तिच्यातलं सहज-शब्दसंगीत ऐकवत जातात. पण असं व्हायला वाचक सहृदय पाहिजे. इथं 'सहृदय' म्हणजे काय ह्या-संबंधीचा विचार थोडातरी ध्यानात ठेवावा. आधी कविता गद्यासारखी वाचायची आणि मग "हे गद्यप्राय आहे" असं म्हणायचं; इथं आपण स्वतःच तर गद्य नाही ना, हा प्रश्न स्वतःस विचारावा.

'सुशील'च्या कवितेची अभिव्यक्ती अगदी सहज भाषेत आहे. त्या भाषेत कृत्रिमता नाही. कारण ती भाषा तिच्या (की तिच्या कवितेच्या?) पावलांची भाषा आहे. 'मनवृंदावन'मधल्या एकावन्नाव्या कवितेत 'सुशील' म्हणून जाते—

**नव्हे नव्हे—**
**ही तर माझ्या**
**पावलापावलांची भाषा!**

ही भाषा 'मनवृंदावन'मधेच कशी येते हे त्यातल्याच पस्तिसाव्या कवितेतील

**चारजणांच्या संगत-सोबत**
**मैफलीतुनी**
**घेते वेचुन रसवंतीस्वर**
**बसते हुंगित मौन कळीचा**
**पराग केसर...**

ह्या ओळींत कळलं. आता ह्या 'केसर'मध्ये तर आणखी जाणवलं. आरंभीच "एको शब्दः सम्यक् ध्यात्वा सम्यक् ज्ञात्वा"सारखं 'सुशील'नं आपल्या शब्दांचं ध्यान आणि ध्यास स्वतःच्या पावलाच्या भाषेत सांगितला आहे. हे शब्ददर्शन सर्वच इथं पुन्हा लिहावंसं वाटतं. पण

**शब्द सांभाळावा लागतो**
**खोलवर**
... ... ...
**शब्द ल्यावा लागतो**
**अंगाअंगात**

ह्या चार ओळीसुद्धा 'सुशील'ची जाणीव किती काव्यसर्वस्वाकडे पोहोचणारी आहे हे दाखवून देण्यास समर्थ आहेत.

शब्दासंबंधीची 'सुशील'ची ही जाण ह्या 'केसर'मधल्या कवितांत सर्वत्रच दिसते—कुठं ओळीत तर कुठं कवितेच्या संपूर्ण अभिव्यक्तीत. कविता आकारानं लहान आहेत, पण आशयानं 'महान' आहेत असं म्हटलं तर मी अतिशयोक्ती करतो आहे असं कुणाला वाटेल; पण मी कवितेतला 'आशय' कशाला म्हणतो आणि त्यातला 'महान'पणा कशात असतो हे समजून घेतलं तर तसं वाटणार नाही. कवितेतला आशय अबोध मनात सुप्तपणं असतो आणि तो अनेक जाणिवांनी आणि संवेदनांच्या साठवणींनी संपन्न झालेला असतो. प्रेरित मनाच्या चैतन्यक्रियेनं त्याचा आविष्कार होताना शब्द फुटतात. ती अभिव्यक्ती. तीतून जो आशय विस्तारत जातो, निरनिराळ्या प्रकारे ध्वनित होत जातो, अधिकाधिक सूक्ष्मपणं प्रतीत होत राहतो, आणि खोलपणा जाणवून देत राहतो, त्या आशयाला मी खोल आशय म्हणतो.

'केसर'मधल्या लहान लहान कवितांत अल्पाक्षररमणीयता आणि बव्हर्थसूचकता हे मोठे गुण आहेत—ते बहुतेक सर्वच कवितांत दिसतात. एका कवितासंग्रहात इतक्या चांगल्या कविता आहेत असं सार्थपणं म्हणणं क्वचितच शक्य असतं; पण इथं ते शक्य झालं आहे. त्याचा आनंदच मी व्यक्त करू शकतो. ही कविता पाहा, ती कविता पाहा; हा विशेष पाहा; तो विशेष पाहा; इथली शब्दकळा कशी नाजूक आहे, तिथली

जाणीव किती खोल आहे—हे तशा कवितांतल्या ओळी उद्धृत करीत दाखवता येण्यासारखं आहे. परिचय करून देण्याचा तो एक प्रकार आहे आणि तो उपयोगीही आहे. पण तसं करताना मी माझ्या विशिष्ट अभिरुचीची आणि आवडीनिवडींची मर्यादा मात्र दाखवीन. इतर सहृदय रसिकांना विनाकरण त्या मर्यादांत अडकवून ठेवीन. कदाचित त्याच आणि तेवढ्याच कवितांवर चर्चा होईल. म्हणून मी मला जाणवत राहणारा एक विशेषच सांगतो. तो म्हणजे 'सुशील'च्या कवितेतील तोल. अभिव्यक्तीत तोल कुठंच ढळलेला नाही आणि मुद्दामहून सहेतुकपणं सांभाळलेलाही नाही. आशय आणि त्याचा आविष्कारच तसा असला पाहिजे आणि म्हणून हे सहजपणं शक्य झालं असावं. अबोध मनात आशय संपन्न होतानाच हे घडलं असावं. संवेदनांच्या, संवादी आणि विरोधी अशा दोन्ही जाणिवा एकमेकांशी संपृक्त झालेल्या असाव्यात. माझ्या मते 'तोल' हा कवितेचाच नव्हे तर काव्येतर अंतरंगकळांचाही प्राण आहे.

अमुकच प्रकारची कविता म्हणजे नवकविता, चांगली कविता, अशी 'बांधिलकी' ज्यांची झाली आहे त्यांना ह्या 'सुशील'च्या कविता भावणार नाहीत. त्यांना आवडणाऱ्या कवितांचं 'शील' वेगळं, ह्या कवितांचं निराळं. पण कवितेलाही एक 'शील' असतं ना? इथं 'शील' ह्या शब्दाचा संकुचित अर्थ घेऊ नये. मुळातला पाहावा.

'सुशील'च्या कवितेचा माझ्या मनावर उमटलेला ठसा मी इथं सांगितला. त्यात चार उत्तेजनाचे शब्द, आशीर्वादपर असं काही नाही. तसं समजू नये. एवढी कृपा माझ्यावर (आणि 'सुशील'वर आणि तिच्या कवितेवर) करावी.

१ जानेवारी १९७७ —अनिल

शब्द सांभाळावा लागतो
अगदी खोलवर
जिथे श्वासदेखील
शिवण उसवणार नाही;
शब्द ल्यावा लागतो
अंगाअंगात, भांगात, स्पंदनात;
शब्द प्यावा लागतो
हलक्याने, केसाकेसांत भिनेतो,
घाईने, पारा उडून जाण्याआत,
एका घोटांत;
शब्द हलकारावा लागतो
अनुनयतांना, गातांना,
शब्दातीत होतांना.

## घाट

असण्यावरती धुकें पसरतें
अन् नसण्याची धरतें वाट :
माझ्या मार्गीं मीच एकली,
सभोवताली झाडी दाट.
विचारधारा धुंद वाहते,
मन नांवाचा दगडी घाट;
झरतां झरतां घट भरतें अन्
काठावरती फुटते लाट.

## पारा

माझ्या भोवती
उभ्याआडव्या
अनेक तारा :
येऊं पाहतात
जवळ जवळ,
घालूं पाहतात
देहावर गळ.
मीही मग
बनतें पारा;
खळ्कन निखळुन
जातें पल्याड,
बघतें तिथून
सैरावैरा
माझ्याच देहाचा
फापटपसारा.

## मी असेन

धुक्यांत लपेटलेल्या ओल्या पहाटे,
जिथे तुमचेच हात
तुम्हांला दिसत नाहीत,
मी दिसणार कशी ?
गाणं ना ?
तें तर अखंड चालूच....
पण स्वर हातीं लागावेत कसे ?
गात असतें
वाळूमधून, वेळूमधून,
तृणपर्णांच्या सळसळत्या
लयीमधून,
निर्झराच्या खळखळत्या ठेक्यामधून;
कुठे म्हणून शोधाल ?
आणि प्रकाशरश्मी
आपल्या गोऱ्या हातांनी
अंधारबटा सावरील, तेव्हा
मी गेलेली भासेन
दूर नजरेपल्याड;
तुम्ही
डोळे उचलून न्याहाळाल,
क्षितिजकोपरे धुंडाळाल
तेव्हा मी असेन
तुमच्याच डोळ्यांत
तुम्हांला पाहत.

## क्षण बावरे

शब्दांच्या रेखीव आकृत्यांमधून शोधलं,
पण दिसली नाहीस;
पापण्यांआड लपलेल्या
स्वप्नांमधून हिंडलें,
पण गवसली नाहीस;
अशीच बसलें
अस्वस्थ प्रवाह
संभावित चेहऱ्याच्या
काठामधून वाहूं देत;
अन् टपकन पडले
वरून कांहीसे क्षण बावरे,
घेत गेले आपल्याबरोबर
वलय....वलय....
आणि तिथेच कविते,
तिथेच गवसलों आपण—
मला तू न् तुला मी.

## तुला सारेंच आठवेल काय ?

मनापासून
मनापर्यंत
गच्च भरला
ऊद नि कापूर
कापूर नि ऊद
तूच जरा
झाड ना डोळा,
उडव ना चकमक,
पेटव ना ज्योत.
भरून वाहील
कापूर नि ऊद.
उदाखाली न्हाईन मी,
न्हाता न्हाता गाईन मी;
गाण्यामधला एक सूर
ओघळत जाईल दूर दूर;
दूरात गीत साठवेल काय ?
तुला सारेंच आठवेल काय ?

## सूर्यासाठी

एका सूर्याला भेटण्यासाठी
चालावें लागतें अंधारभर,
कोंडून घालावा लागतो स्वर,
माराव्या लागतात इच्छेला गाठी
एका सूर्याला भेटण्यासाठी.

एका सूर्याला भोगण्यासाठी
कवाडें उघडीं करून सात
जाळून घ्यावी देहाची कात,
बेभान होऊन मारावी मिठी
एका सूर्याला भोगण्यासाठी.

एका सूर्यांत रुजण्यासाठी....
सूर्य डोळां, सूर्य गळां,
सूर्य भरावा नसानसांत;
आपण केवळ सूर्यासाठी
एका सूर्यांत रुजण्यासाठी.

सूर्य आपल्यांत की आपण सूर्यांत ?

## पाखरांनो

पाखरांनो,
तुम्हांला आमंत्रण दाही दिशांचें,
उन्मुक्त वाऱ्याचें,
गर्द निळ्या आसमंताचें;
उडा....
घ्या ना भराऱ्या
बेबंद धुंद;
तुम्ही दिशांचे
दिशा तुमच्या....
मात्र पाहूं नका माघारी—
मला साहवायचें नाही तें.
तुम्हांला माहीत आहे ?
तुमच्या इवल्या पंखांना उबवतांना
घेतलें होतें स्वतःला विणून.
आता उडूं द्या ना रे,
तुमच्या पंखांनी, पाहूं द्या ना रे,
तुमच्या डोळ्यांनी
मला....
मी विखुरलेल्या
जळा-स्थळा-काष्ठा-पाषाणाला.

## फुंकर

सांभाळून ठेव
तुझी वत्सल हळवी फुंकर;
आताच घेऊन ती काय करूं ?
अजून किती झुंजायचंय तांडवाशी.....
जखमा ठिबकत्याच हव्यात
उगाच त्यांचं भान घेऊन
काय काय जपूं ?

जेव्हा सारेच परततील ना
स्मशानांत माझें ओझें टाकून,
करतील ना माझ्याच नांवाची
शेवटची आंघोळ,
तेव्हा....कदाचित तेव्हाच
हवी असेल मला हळवी फुंकर.
ए....पण पुरेपूर ओतशील ना माप ?

## व्यसन

आता व्यसनच लागलेलें
घणांचें,
घणांच्या घावांचें
आणि
घावागणिक उडणाऱ्या
अग्निफुलांमधून
उधळण्याचें.

## क्षणांची वाटणी

सावधान ! आकाश आता
दुभंगून जाणार आहे.
चल आटप, आवर सारें,
करून टाक क्षणांची वाटणी
माझें ? माझें राहूं दे.
तू काय काय घेतलेंस ?
प्राजक्ताची शिंपण,
थरथरती जुई....
की घाटावरची मध्यानरात ?
पण तें तू घेतलेंस ना ?
त्याचा लोभ मला कशाला ?
मी चालतां चालतां झरत जाईन,
झरते क्षण भरून घेईन.

## इतकेंच कसें

झिळमिळत्या पानांमधून
चोरपावलाने आलेल्या
थरथरत्या उन्हासारखें
अस्तित्व :
लोपत नाही कधीच.
कधी चांदणें, कधी ऊन,
कधी अंधाराचा घेऊन वसा
कुरवाळतात दिशा दिशा....
इतकेंच....
इतकेंच कसें ?

## अस्तित्व

इथल्या इथं
कितीदां उगवावं अन् कितीदां मावळावं
त्याला अंतच नाही.
उगवतांना
काळोखाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करून
रंध्रारंध्रांत लक्ष सूर्य
पेटून उठलेले;
मावळतांना
खोल खोल गर्तेतदेखील
प्रकाशाचं लुडबुडतं अस्तित्व.

## संपून जाय

तू असल्यावर आणखी काय ?
तू नसल्यावर
ठायीं ठायीं विखुरलेलें
तुझें असतेपण
तू असल्यावर संपून जाय.

## प्रियकरा

मी दु:खानंच भारलें आहे
असं नाही
की सौख्यानं भागलें आहे
असंही नाही;
पण हीं सारींच वस्त्रं आता
अंगजड झालींत.
तीं सारींच एकेक उतरवून
मी येतें आहे—
तू हात पसर,
मृत्यो, प्रियकरा.

## भरल्या जंगलांत

मनापासून जनापर्यंत
तसा रस्ता दूरचाच :
सरळसोट भासणारा,
बाहुल्यांमध्ये हसणारा,
पण आभाळागत रुसणारा.
मनापासून जनापर्यंत
पुरते येऊंच असं नाही,
आलों तरी
मागचं दार लावून घेऊं
असंही नाही.
जनापासून मनापर्यंत
वाटेमध्ये चकवेच खूप
उन्मळून पडलेले
उद्ध्वस्त स्तूप;
यांच्यामधून यायचं कसं ?
भरल्या जंगलांत राह्यचं कसं ?

## हेंच झाड

हेंच झाड
भासलें होतें
हिरवेंगार :
छाया हिरवी,
पानें हिरवीं,
श्वासदेखील
हिरवे हिरवे.
हेंच झाड
हिरव्यापिवळ्याचें
सुरंग मिश्रण.
मातट फांद्या,
रुतट छाया,
थरकती काया....
हेंच झाड?
हेंच झाड!

## शब्दांनो

अंधार फाडीत नजरेचें टोक
आंत आंत जातें तेव्हा
शब्दांना शस्त्राची गरज भासत नाही.
शब्दांनो, बनूं नका रुखे फिके
सांधूं नका गीतांमधून....गतीमधून....
जागोजाग मुरडून घेतलेल्या वळणांमधून;
शब्दांनो, खैरीयत ठेवा आपली,
आपल्या आत्म्याची
आपल्या वेगळेपणाला जोडणाऱ्या
रेषेची.

## अधिक-उणे

आपल्याला आपल्यापासून
गहाण टाकण्याअगोदर
तपासून घ्या महाभागांनो,
साऱ्याच हिशोबांना :
तुम्ही किती भागांनी
कुठे कुठे गुंतले आहांत,
किती ठिकाणी
वजा केलेंत स्वतःला
आणि कुठे कुठे बेरीज केलीत
आपणच आपल्याशी,
शेवटी सारेच उणे
किंवा बरोबर अधिक उणे
असले तरी.

## हरवून जाल

नांव पुसताय ?
कुठलं सांगूं ?
इत्ति मित्ति नाती कित्ती :
जितके दिवे तितक्या वाती.
तुम्हीच घ्या ना ठेवून नांव.

ठाव पुसताय ?
कुठला दावूं ?
चांदणमाळ, पळसथाळ,
काठोकाठ भरली विहीर
की रानामधला सुनसान पीर ?

गांव पुसताय ?
त्या गांवाला नांवच नाही,
वेशीपल्याड वाव नाही;
मात्र आहेत बारा वाटा :
चुकून जरी कधी याल
तुमचेच तुम्ही हरवून जाल.

## जाणीव

जसं दार उघडावं
तसं स्वतःला उघड
अन् येऊं दे आत.
तुला ठाऊकच आहे
तसा दरवाजा कधी
ठोठावलाच नाही
की बंद म्हणून परतलेंही नाही.
कधी तरी येणार हें तुला
तसं मलाही माहीत होतंच की
मग उगाच तोरणं कशाला ?
तुझ्या काटेरी फणसाळ राज्यात
टचटचून फुटूं दे रक्ताचे धुमारे
अन् वाहून जाऊं दे
खुंट्याला बांधलेली
अहंची जाणीव.

## देहापुरती

सूर्य बोलक्या अबोली रंगापुरता,
झाडें सावळ्या सावल्यांच्या झावळ्यांपुरती,
माणसें चेहरे हरवलेलीं
अन् सौधावर उभी मी
केवळ देहापुरती.

## कोणी तरी या रे

कोणी तरी या रे
आणि या एकलेपणाच्या वणव्याला
अस्तित्वाच्या बिंदूबिंदूंनी
चिंब भिजवून टाका.
केवढें....अफाट अंतर....
तुम्ही तर सारे देहाच्या तीरावर,
इथे खोल....खोल
ग्रासूं पाहणाऱ्या एकांतज्वाला....
अपेक्षांची केवढी ही दर !
तुम्ही ओलांडूं नाही शकणार ?
मी तरी येऊं कशी ?
पावलं मातींत रुजलींयत जशीं....
या....कोणी तरी या रे....

ग्रंथालय ठाणे
२२३८८
काव्य
२३६०
शाखा (स्थळ प्रत)

## माझी चोच

माझी चोच इवली सान,
काही थेंबांचीच तर तहान;
अरे एवढं देऊं नको,
दानांत वाहून नेऊं नको.

## निळाई

तुम्ही साऱ्यांनीच माझ्या आकाशाचा
एक-एक तुकडा चोरलात;
निळाई मिळाली की नाही
मी काय जाणूं ?
पांघरायपुरतं आकाश पुरे की;
जास्ती हवं कशाला ?
एक बरं झालं :
आकाशाच्या पल्याडचं
दिसायला लागलं.
आता तुम्ही घ्या, घ्या....
निळाई संथच.
पांढरे ढग कधी येतीलही,
काळे मात्र मुळीच नाही.

## गाणं आहे

गाणं म्हणून गातांना
मला ठाऊकच नव्हतं
तें संपवावं लागतं.
त्यांतल्या स्वरास्वराशी
मी विणून घेतलंय.
श्वास, आस, ध्यास
गाणंच झालेत.
तू म्हणतोस म्हणून
मानूं कसं गाणं संपलं ?
मी आहें, गाणं आहे.

## शिंपलं

कोसळूं नये आकाश,
फक्त भरून यावं;
सांडूं नयेत शब्द,
मन ओथंबून जावं;
प्रश्न असे :
आसुसलेलीं उघडीं तोंडं;
उत्तरं शोधून
आपणच आपलं
शिंपलं मिटीत जावं.

## अभंग

स्वीकारावंच लागेल दान
म्हटलं असतंस तर
दान स्वीकारलंही नसतं....कदाचित.
पण पाकळ्यापाकळ्यांमधून
भरूनच आल्यावर
नाकारू तरी कसे तुझे रंग ?
तरीदेखील केसरभांडार अभंग.

## पुन्हा

कौरवसभेंत वस्त्र
पुरवतां पुरवतां
पाशही वेढलेस भोवती,
किती फेडूं अनंता ?
पुन्हा एकदा धाव रे जगन्नाथा.

## धागे

हे धागे आटायचे नाहीत,
तुटायचे नाहीत,
पिळून पिळून होतील बारीक—
इतके की
डोळ्यांनाही दिसायचे नाहीत;
अदृश्याला मारतील गाठ :
तलम वस्त्र वीण दाट
नखापासून शिखेपर्यंत,
स्नेहापासून वैरापर्यंत,
बालापासून वृद्धापर्यंत,
जिथे तिथे धागेच धागे.
आमच्या तुमच्या हातीं काय;
धाग्यानुसार टाकूं पाय.

## उजळूं दे

चार कोपरे मनाचे
भरून भरून वाहूं दे;
रुल्यासुक्या माळावर
उन्ह भिजवून गाऊं दे.

चार फांद्या तनाच्या
अशा झुलत्या राहूं दे;
वादळवात विस्मितसा
भवती झिम्मा घालूं दे.

चार ढीग धनाचे
आत कुठे माऊं दे;
दिवली हातीं घेतल्याविणा
अंधारवाट उजळूं दे.

## वाया

ओहटलेल्या किनाऱ्याची
माती कशी मऊ :
नका नका कोणी येऊं,
नका ठसे देऊं.

जातां गातां लिहून गेली
एक ओवी लाट :
"सांभाळ बरें,
पुसूं नको संकेताची वाट."

पाखरांनो नका वाहूं,
रुजतील ना रे छाया,
ओवीमधला तालसूर
सुटून जाईल वाया.

## देहाकृती चंद्रसूर्याच्या

घेतांना डोळे मिटावे म्हणतात,
म्हणजे
कुठल्याही लाभांत किंवा लोभांत
गुरफटणें नसावें.
मींही ठेवलीं त्याच वाटेवर पावलं
म्हणूनच तू दावा साधलास.
पसरली होती
वरती ओंजळ,
खाली चौपदरी,
पण देतांना असा बरसलास—
आरपार करून गेलास
ओंजळ, पदर;
कोरून गेलास
देहाकृती चंद्रसूर्याच्या.

## प्रश्नांचा पूर

टांगलेला जीव
उतरून कोणी
झोळींत घातला ?
ग्रीष्माचा सूर
तळ्यांच्या गळ्यांत
कां बरं दाटला ?
प्रश्नांचा पूर
बंधारे फोडून
कसा ग फुटला ?

## सरेल ग

झांजरमांजर सुटलाय वारा
पावसाच्या धारा
येतील ग येतील ग
भिरभिर भिंगरी मेघांची फुगडी
नभांत आता रंगेल ग रंगेल ग
सरसर सरसर गारांचा मारा
चौराभौरा
सांडेल ग सांडेल ग
टिपतां टिपतां चांद्णफूल
देईल हूल
सावर बघ तें
झरेल ग सरेल ग

## होडी

समुद्र....तो पार करायला
तुला मागितले मीं
निदान तुझे हात.
त्यांचीं वल्हीं करून
करीन म्हटलं पार समुद्र.
समुद्र कित्येक मनांचा,
मोकाट रानांचा,
उभारतिभार ताणांचा.
मी मात्र पाण्यावरची होडी.

## आठी गाठी

विंचरून घ्यावेत
जसे केस केस
जरा वर पकडून,
हलक्या हातीं गुंतावळ
सोडवावी....
तसें आपलें मन
—त्यांतल्या आठी गाठी—
निचरतां आलें असतें तर....

## भर दिवसा

तुझ्या तांबूस रेशीम-केसांचा फुलोरा
नको....नकोसच फुलवूं;
सांग वाऱ्याला :
नको खेळूंस
बटाबटांतून,
विजेरी तारांतून;
बघतां बघतां
भर दिवसा
सूर्य जाईल ना भोवंडून.

## शब्द

तिळा उघडतां उघडत नाही.
ठोठावून....ठोठावून
हात रक्ताळलेत;
शब्द....एखादी पणती जपावी ना
तसा आणला होता
तळ्हातींच्या गाभाऱ्यांतून;
पण वाटच चुकली....
कशीबशी वाटेवर यावें—तो
शब्द कुठाय?
आता फक्त ठोठावणें
जखमा वाहीतों....
कोणीं सांगावं
त्यांतूनच येईल वर
गुंतला असेल तर.

## तू

शरीर नुसतें उपकरण,
माध्यम नव्हे,
तुझ्याप्रत येण्यासाठी
जसे
धूपदीप, तुळस, दुर्वा.
त्यांतलें कांहीच नसलें तरी
तू 'तू' आहेस,
मी 'मी' आहें
किंवा
मी 'तू' असणार, पण
तू....?

## उल्कापात

आशयाच्या घनदाट उबेंत
किती वेळ उबवूं
या काठचिमण्या ?
कधीतरी आरवेल ना
गाणें सूर्यमुखी ?
किती आंदोळावीं लागतील आणखी
तुमचींच फुलें ?
साहूं दे ना उल्कापात
भरल्या तळ्यांत.

## अपुरी आहे

तुझ्या पाकळ्यांतून
कविता उमलतांना
किती भारावलं होतं आकाश,
पान न् पान जडावलं होतं.
पागोळ्यांनी जाग आणल्यावर
कुठं कुठं प्रवास झाला
काय काय सांगूं ?
पाखरांची स्वैर लकेर,
पाण्यावरचे थरकते रोमांच,
सूर्यडुबी कातरवेळा,
एकाकी घरट्याकडे परतणारा
विद्ध पंछी....
थांब थांब,
शक्य झालं तर
थोपव वसंताला,
अजून हीच कविता अपुरी आहे.

## तळ

केवढे हे आघात-प्रत्याघात :
मीच काय
आसमंत थरारलंय.
अवकाशांतले झगमगते दीप
नुसतीच पाहत होतें
गुडूप गुहेंतून....
तू आलास
खोलवर पाहिलेंस डोकावून
लक्ष लक्ष दीपांनी भारून
शोधतें आहें अविरत लाटांतून
तळ कुठे आहे....कुठे आहे....

## कदाचित्

त्या डोळ्यांतलें
फुलून विझूं घातलेलें सूर्यबिंब
उचलून फेकलें
माझ्या तळ्यांत;
झेललें नेमकें
तळमलें....जळलें
जाळीलसुद्धा
कदाचित् तुला,
कदाचित् मला.

## भैरवी

फांदी झुकलेली,
डोळ्यांत कातर चांदणं,
वरच्या मंदिरांतून येणारी
रिमझिमती आरती.

फांदी झुकणारीच,
डोळे नसतातच,
वरची भैरवी
आरपार छेदणारी.

## त्याचं काय

पांघरूण झालेलं आकाश
विस्कटेलही,
मला आंदोळणारे उन्हाचे हात
साकळतीलही,
झेलणारे तरंगते स्वर
रेंगाळतील....रेंगाळणारही नाहीत
रानपाखरासारखे.
मी असेन....नसेन,
पण
हीं फुलं बीजं रोवतील
त्याचं काय ?

## साक्ष

शब्दसुद्धा जेव्हा
पकडूं शकत नाही
अर्थवाही किनारा
तेव्हाच तुझ्या
दाक्षिण्याची साक्ष.

## सावलीच

तसं नेहमीचंच होतं सारं....
सांज नसून सांजावलेलीं
गहनगूढ सावल्यांचीं झुंबरं;
तू उगाच तळपत्या किरणांनी
झकझोळून पाहिलंस;
क्षणभरच सारं लकाकलं;
पुन्हा नातं सावल्यांशी.
वाटलं, नेहमीप्रमाणंच
पुढच्या प्रवासाला निघशील तू.
उगाच कुहरांत
आत आत शिरत राहिलास.
तुला माहीत आहे ?
सावल्यांच्या जंगलांत
एक झाड
झगमगायला लागलंय;
तू मात्र
एक सावलीच होऊन गेलास.

## ऊन

ऊन हळवं, ऊन पोवळं,
पानापानांतून फिरणारं,
चोचीचोचींत शिरणारं;
ऊन हवशाचं, ऊन गवशाचं,
खिडकींतून दिसणाऱ्या कळसाचं,
सावलीच्या भरंवशाचं;
ऊन खोल खोल डोहांत डुंबणारं,
लाटेलाटेतून थरकणारं,
मध्येच अवचित फुलणारं;
ऊन पाठशिवणी खेळणारं,
पळणारं व्याकुळ हाकांना हुलकावणी देत,
सायंघंटेच्या सुरावर विझणारं....सरणारं....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22300
9104
2360
(स्थळ प्रत)

## अदेखणा

पाण्यासारखं नितळ, निर्मम, निराकार
असावं नातं तुझं माझं.
पानाफुलांनी लहडलेल्या गरत्या
वा शुष्क डहाळ्या रित्या
कळाव्यात प्रतिबिंबांत तुझ्या-माझ्या;
अदृश्य मुळें अशीं रुजावींत
कळूंही नये कशीं कुणांत कशीं कुणांत;
तरीही असावा घाट अदेखणा
त्रयस्थपणांचा तुझ्यांत माझ्यांत.

## छायाबन

सर्वदूर ऊन. नुसतंच ऊन.
वरची सैलसर निळाई,
झाडें अगदीच कमी,
त्यांनीही घातलेला मिल्ट्री युनिफॉर्म,
स्वप्नांचा थवा दूरवर पोचलेला,
वेढणारं खालीवर फक्त ऊन,
कुठल्याच सावलीनं सगेपण नाकारलेलं....
अशा वेळीं आपण
आपल्याच सावलींत छायाबन.

## भोवरे

एकान्त चोहों बाजूंनी दाट
वेढलेला गर्द
असा सर्वदूर पसरलेला समुद्र;
एकाकी नाव
कितीही हाकारली तरीही
दिसूं नये गाव;
हे लोटच्या लोट
भरून भरून येणारे
माणसांचे चित्रविचित्र चेहरे;
गर्दीत आणखीच दूरवर
नेणारे भोवरे.

## दुसरा राजपुत्र

सराईतपणे तुम्ही यायचं....
दाराशी कुत्रीं असतील वाघासारखीं :
नवखेपणा तीं तेव्हाच हेरतात;
नवखेपणा दाखवायचा नाही,
पायांत शेपूट घातलं तरी
त्यांना थोपटायचं नाही;
इथंच फसाल....
सरळ आत चालत यायचं....
पुढे आणखी कांही प्रलोभनं
हात जोडून करीत असतील
तुमचाच इंतजार :
त्यांच्याकडेही डोळ्यांच्या कोपऱ्यांतून वा
नासिकेच्या पाकळ्यांतून बघायचं नाही;
एकामागून एक सात दालनं ओलांडायचीं :
इथेच तुम्ही देव होणार की दगड ठरायचंय :
देव झालांत तर पुढे....आणखी पुढे....
दगड झालांत तर वाट बघा येण्याची
दुसरा राजपुत्र.

## फिके ऋतू

अज्ञात देशांतून
पक्षी केव्हाच निघालेत,
त्यांना क्षणभर टेकायला
हा माझा पदर पुरेल?
तशी गाण्यानेही कधी
वस्ती केली नाही इथे;
जिथे आलापावेंसें वाटलें
तिथून सूर दूरवर पोचलेले.
ऊनही आता चंद्रावलंय डोळ्यांत,
पाऊसही तसा कोसळत नाही आत....
सारेच ऋतू असे फिके कसे?

## महिरपींत

महिरप घातलीस
दाट बांबूंची
आत विंबवून
नसलेलं असतेपण.
वांबूच ते पोकळ
तुझ्या शब्दांसारखे;
त्यांचीच बासरी करून
फुंकतांना
स्वर झरतील,
फिरतीलही सावलीभोवती·
बसेन म्हणतें
त्याच महिरपींत.

## काजळरेखा

आणि पुन्हा एकदा
सूर्याने आन्हिक उरकलें :
तळ शोधतांना
स्वतःच लालबुंद झाला
आणि देखतां डोळां
सामावून घेतलें
अगदी खोलवर.
पाणी उदास हसलें
किंचित् हेलकाव्याने
आणि रेखून घेतली
काजळरेखा
मंडलाकार.

## गंधभार

जबरदस्त तिरस्काराची लाट
जबरदस्त उपेक्षेची.
झुळक्या....सुळक्या....कारुण्याच्या लाटा....
प्रचंड सहानुभूतीची....
महाभागांनो !
तुमच्या कुठल्याच लाटा
पोचत नाहीत इथे.
इथे तर झिमझिम बरसणारी
फुलांची झाल.
जातां जातां तुम्हीही चार न्याल ?
पण पेलवेल ना गंधभार ?

## लेणं

रखरखीत प्रांगणांत
अलवार झुळकेनं
चुंबावं गात्र नि गात्र
तशा तुमच्या
आठवणींचीं स्नेहल पिसं
ठेवून दिलींयत खोल तळांत;
एकदा हा जगण्याचा घाटमाथा
चढूं दे सावकाश,
मग गाईन सजवून फुलोरा
मुक्त स्वरांत :
"जगणं किती देखणं होतं,
कसं लेणं होतं!"

## धुकं

दूरवर पसरलेला
विस्तीर्ण आयुष्याचा माळ,
चालतांना होणारा अचूक
श्वासांचा ताल;
कधी तरी केव्हा तरी
असं उमळून येतं....
माळ....चाल....ताल....
सारं नाहीसं होतं
विलगून आपल्यांतूनच आपल्याला
जसं तुमच्या-माझ्यांत
पसरलेलं धुकं.

## काळेभोर

माझी दया त्यांना पुरणार नसते
ओंजळभर,
माझी मायाही अपुरी असते
पंखभर;
त्यांना वेढून असतें
वणव्याचेंच आगर;
मी नितळ आकाश बनलें
तरी मेघ लोंबून जातात
काळेभोर.

## आधार

भुईकमळ
मीं अजून पाहिलंही नाही,
पण असणार असंच....
जसं
आयुष्य उगवून
आधार घेतं
कुठल्यातरी भुईचाच
देठ असून नसल्यासारखा.

## सरी

भरभरून आल्यावर आभाळ
वारं सुटूं नये म्हणतात कधी,
पाऊस विरून जातो अवेळीं;
असं उतूं उतूं आलेलं मन....
थांबव ना तुझ्या लकेरी,
साऱ्याच सुन्या होतील ना रे सरी.

# बंजररान

तर मग सांग पोरी,
फुटक्या गवाक्षांमधून
सांडलेलं चांदणं,
तुळशीजवळच्या दिव्यानं
भिंतीवर आकारलेली प्रभा,
की दारांत उभ्या असलेल्या तुझ्या
मंजिरी डोळ्यांतलं स्वप्न
यांतलं खरं काय ?
चांदणं पितांना डोळ्यांत बांधले जातील गजरे,
डोळे मिटतील;
या असंख्य लखलखत्या दिव्यांनी
सोलून काढलेला गाभा,
तुळसदीप आंतही आल्हादेल;
आणि तुझ्या कुवार डोळ्यांतलं स्वप्न
कुठलं बंजररान
लहरून टाकील, बहरून टाकील ?

## क्रमप्राप्त

आपल्याला आपल्यापासून
चोरणं सोपं; पण
नंतर सांभाळणं कठीण.
हिरव्या संभारांत ठेवावं तर
गारठून जायची भीती,
लाटांवर ठेवावं तर
विखरून जायची,
आकाशाकडे द्यावं तर
झाकळून जायची.
त्यापेक्षा दगडधोंड्यांत
ठेचाळणं क्रमप्राप्त.

## सावकार

धगधगत्या उन्हाच्या प्रांगणांत
एकाकी ढग
सावलीचा तुकडा फेकून
जगूं पाहतोय
बेवारशी आत्म्यासारखा
जसा भुकेल्या श्रमिकांच्या वस्तीमध्ये
कासवासारखे अवयव आत ओढून
जगूं पाहतो एखादा सावकार.

## पुष्करिणी

जावेंच लागतें का प्रत्येकाला
ज्ञात-अज्ञात उद्यानांतून पार;
एक संपल्याशिवाय उघडतही नाही
दुसऱ्याचें प्रवेशद्वार.
असतें साऱ्यांतच सारें....
मध्यावरच्या पुष्करणीही....
नांवंच तेवढीं न्यारीं न्यारीं
जसें आईचा पान्हा, आकांक्षा, प्रणय,
वात्सल्य, मृत्यू वगैरे वगैरे....
प्रत्येकांत घसा ओलवायला
मिळेलच असें नाही,
प्रत्येकाच्या वाट्याला त्याच पुष्करणी येतील
असेंही नाही.

# शिल्प

शिरल्या दारांत संधिप्रकाश,
आत तर अंधार गुडूप,
पायाशी विझलेल्या काड्यांचा खच पडलेला.
एक तर....काडी पेटवून धरणाराच
जेमतेम दिसायचा;
एखादा स्वत:पासून दूर करून
शिल्प उजळायचा....
कातीवकोरीवपणाची कल्पना येण्याआत
काडी संपायची :
स्वत: अन् शिल्पाशिवाय
एखादी काडी वास्तू उजळायची.
पाषाणी खांब....गहनगूढ अंधार
आणखी मोठे व्हायचे !
आता घ्यावेत मिटून डोळे,
बघावें बोटांना नेत्र करून....
आणखी काड्यांचीच भर कशाला ?

## दिवस मावळतांना

प्रत्येक दिवस मावळतांना
मी होत असें भयभीत;
निर्माल्य झालेले असंख्य दिवस
आता उतरून ठेवायलाही
जागा उरलेली नाही.
दिवसागणिक इंचाइंचाने
उघडत होता आतला दरवाजा;
जरा वाट तर बघायचीत....
मी उंबऱ्यापाशी येतें तोवर
साऱ्याच पाठी वळलेल्या कशा ?

## पदर

मीं नव्हतें वसवलें शहर तुमच्यासाठी.
दाखवली जागा मुकाट्याने घेतली
शहाण्या मुलासारखी;
त्या तशा संध्याकाळीं
तुम्ही आलांत
काळोख आणखी गडद झाला;
अपुरा पदर पसरतां येईल
तेवढा पसरला.
उद्या उजाडल्यावर तुम्ही विचाराल,
इतके काकडलों कसे ?
किंवा गाव नव्हतं, घर नव्हतं
मग ऊब कशी ?
तुम्हांला निघावेंच लागेल पुढे--
भूकलाडू तहानलाडू देतें सोबत थोडे....
"ज्या घराला छत नसतं ना
त्यानं आभाळाचं छत मानायचं असतं;
भिंती नसल्या ना
त्यांच्या दिशाच भिंती असतात.
फाटक्या ओंजळींत घ्यायचं नसतं
कोणाचं दान.
सूर्य दाखवायचा नसतो मुठींतला
कोणाला गंमत म्हणून.
आणि बाळांनो, माघारीं वळून बघायचं नाही;
चेटक्या पाठलाग करतील."

## तसें

झुकाव्यात पापण्या
तशीं लवलेलीं झाडें;
अगतिक आयुष्य
तशी थांबा नसलेली सडक;
आपण....तसें
नसूनही असलेलें आभाळ

## पाऊस

लोपून जावें निर्लेपण
इतके ढग वाहत आहेत,
भारावून आलेल्या चिंता
मन साहतच आहे;
विस्तारलेले आकाशभर डोळे :
कुठे गडगडत नाही,
पाऊस झडतही नाही.

## चौकट

दिसणाऱ्या आभाळाला असते
ठाशीव चौकट,
न दिसणाऱ्याचें अपार रूप
जाणतों सारेच....
पण भरून घेतांना
त्यालाही चौकट
डोळ्यांची....मनाचीही.

## कुंदा

नखळून काढाव्या हलक्या हातीं
शिरा पानावरच्या
तशी सोडवावी जिव्हाळ जाणीव,
शिंपून टाकावें नि:संग होऊन....
विरावें जसें तापल्या मातीवर पाणी.
पण कुंद्याच्या मुळांना
खणावं लागतं,
उचलून बांधावर
फेकावं लागतं,
अवचित पाण्याचा
नियम नसतो....
कुंदा पुन्हा
घर वसतो.

## ठेव

ठेव द्यावी सांभाळायला कपाटाआत
कोणीतरी....कांहीएक दिवसांसाठी,
तितकाच सांभाळलेला तुला उदरांत.
करूं शकला असता जें स्त्रीदेह कुठलाही,
कळत नाही....कां यावें भरून ममत्व
कर्तृत्व नसतांनाही;
कशासाठी घालाव्यात बेड्या
नसलेल्या ऋणाच्या भरतीच्या पायांत;
कशासाठी विसरावें मागच्या लाटेने
दिलेला खो पुढच्या लाटेला;
कशासाठी यावा उमाळा दाटून
निरखतांना तुला कुरवाळतांना !

## घरटं माझं

पन्नास वेळां घडतं घरटं
मोडून टाकतांना
त्यांचेही हात भरून आले असतील....
एकावन्नाव्याही वेळी
तीच अथक चपळाई,
चोचींत एखादं पीस,
चार काड्या, रेशीमतुकडा.
चिमणे, चिमणे....
घरांत घर बांधूं नाही
दुसऱ्याच्या घरांत नांदूं नाही
उरांत बांधणं त्याहून सोपं
कोणाला तें बाधत नाही.
चोच आवर, पंख सावर....उडून जा
चिमणे, चिमणे....
मी गातें तेंच गाणं....
वाऱ्याचे हात, उन्हाची कात
घरटं माझं उसवतायत.
चिमणे, चिमणे....
उडूं कुठं ? घरटं माझं बांधूं कुठं ?

## चाळ

कसे सजवले होतेस
प्रवाहभर दिवे
जसे निळाईंत
वाहत्या तारकांचे थवे;
सांग ना कुणाचें आयुष्य
किती होतें ?
किती पालख्या, नगारे
होते मिरवणुकींत ?
तू काय शोधीत होतीस गर्दींत ?
तुझा संस्कारी स्वर
की साऱ्यांच्या नकळत
तुझ्या पायांतून हरवलेला चाळ ?

## प्रवास

दिवे विझलेच होते की
प्रकाश झाकून ठेवला होतास मा ?
तिथवर पोचायला
कितीतरी अडसर
दूर करावे लागले;
वाट सरावली तेव्हा
अंधाराचीच किनार हातीं होती.
तुझ्या गर्भाचा रेशीमकोष
सुटल्यापासून
किती कठडे बदलले नित नवे :
आधार पुरला नाही.
—पुरतच नाही....
प्रवास सरतच नाही....

## निरोप देतांना

लांबलचक गाडी निघून जावी
तसे ऋतू सरकलेले
बघत राहिलीस एकटक
मला निरोप देतांना :
किंचित पुढे झुकलेली तू....
तुझा थरथरता हात
जणू त्यातच वाहून जाणार.
फक्त एकदाच मिटून घेतलेस डोळे :
जाडसर अश्रू खाली ओघळले
—सारंच निपटून तू चालू लागलीस....

२३८८
का. क. काव्य
२३६०
REFBK-0022388
REFBK-0022388

## तुझे डोळे

बाऱ्याला डुलकी लागली असावी;
स्वर हरवले असावेत चिमण्या-कावळ्यांचे;
पायाखाली चुरणाऱ्या पानांशिवाय
कोणी-कोणीच घेत नव्हतं दखल
माझ्या येण्याची !
तुझे डोळे....घेत होते वेध अंतराळाचा.
इथे माझ्यासाठी जागाच नव्हती ना....
माघारीं वळले तर
तुझी चोळी कां भिजावी मा ?